# अमर हिंद मंडळ, दादर

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई-४०० ०२८. दूरध्वनी : २४२२ ३५ ८९

स्थापना : २६ जानेवारी १९४७ सार्वजनिक विश्वस्त नोंद क्र. एफ ४३ मुंबई, (रजि. १७८६/२५-६-१९४९)

www.amarhindmandal.com | amarhindmandal@rediffmail.com

AMAR HIND MANDAL, GOKHALE ROAD (NORTH), DADAR (WEST) MUMBAI - 400 028.

❖ विश्वस्त ❖
श्री. दिनकर पाटील
श्रीमती उषा मेहता
श्री. रमेश वरळीकर

❖ अध्यक्ष ❖
श्री. भास्कर सावंत

❖ उपाध्यक्ष ❖
श्रीमती उर्मिला शेणॉय
श्री. चिंतामणी नागले

❖ कार्याध्यक्ष ❖
श्री. दीपक पडते

❖ कार्योपाध्यक्ष ❖
श्री. अरुण देशपांडे

❖ कार्यवाह ❖
श्री. श्रीकृष्ण राणे

❖ संयुक्त कार्यवाह ❖
श्री. प्रफुल्ल पाटील

❖ कोषाध्यक्ष ❖
श्री. सतिश रेडीज

## अमर हिंद मंडळ, दादर, आयोजित

### राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा - २०१८

### वर्षे २१ वे

### नियमावली

१. या स्पर्धेत कोणतीही संस्था सहभागी होऊ शकेल. स्पर्धक संस्था स्पर्धेत नवीन / जुन्या एकांकिका सादर करु शकतात. मात्र लेखनाचे पारितोषिक नव्या एकांकिकेसाठीच राहील.

२. एकांकिकेला आशय / विषयाचे बंधन नसेल. एका व्यक्तीला, कलावंत, म्हणून कोणत्याही एकाच एकांकिकेत सहभागी होता यईल. एकांकिकेचा कालावधी कमीत कमी ३५ मिनिटे व जास्तीत जास्त ४५ मिनिटे एवढा असेल.

३. प्राथमिक फेरीतील संस्थासाठी सादरीकरण लॉट बैठक शनिवार दिनांक ६ ऑक्टोबर २०१८ रोजी सायंकाळी ६.३० वाजता मंडळाच्या कार्यालयात होईल. त्यावेळी स्पर्धक संस्थाच्या प्रतिनिधींना हजर राहणे आवश्यक आहे.

४. प्राथमिक फेरीचे सादरीकरण शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर ते रविवार दि. १४ ऑक्टोबर २०१८ सकाळी ९.०० वाजल्यापासून तालीम स्वरुपात अमर हिंद मंडळ, अमर वाडी, गोखले मार्ग (उत्तर., पोर्तुगीज चर्चजवळ, दादर, मुंबई - ४०००२७ येथे घेण्यात येईल.

५. प्रत्येक संस्थेने आपल्या कलावंत तंत्रज्ञासह सादर करण्यासाठी सादरीकरण वेळेपूर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्राथमिक फेरीसाठी स्पर्धक संस्था आल्याची नोंद करताना स्पर्धक संस्थेने एकांकिकेच्या तीन प्रती, लेखकाची परवानगी, एकांकिका सेन्सॉर प्रमाणपत्राची झेरॉक्स, नेपथ्याचा आराखडा व कलावंत तंत्रज्ञ यांच्या यादीच्या प्रती आयोजकांकडे उपलब्ध असलेल्या छापिल तक्त्यातच भरून आयोजकांकडे सुपूर्द कराव्यात. अंतिम फेरीसाठी निवड न झालेल्या स्पर्धक संस्थांना ह्या गोष्टी दि. २० ऑक्टोबर २०१८रोजी सायं. ७.०० ते ८.०० या वेळेत परत करण्यात येतील. आयोजकांना प्रवेश फी भरल्याची पावती दाखवून त्या त्यांनी त्याच वेळी नेणे आवश्यक आहे. नंतर सदर गोष्टी परत करण्याची जबाबदारी आयोजकांवर असणार नाही.

६. प्राथमिक फेरीचा निकाल आणि अंतिम फेरीत निवड झालेल्या एकांकिकांच्या सादरीकरणाचा क्रम प्राथमिक फेरी संपल्यावर लगेच जाहीर करण्यात येईल.

७. प्राथमिक / अंतिम फेरीसाठी आयोजकांतर्फे ठरविण्यात आलेल्या परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

८. **प्राथमिक फेरीत सादर झालेल्या परंतु अंतिम फेरीसाठी निवड न झालेल्या एकांकिकेतील संस्था, लेखक, दिग्दर्शक, कलाकारांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र आणि लेखनासाठी प्रत्येकी रु. २५०/ -ची तीन पारितोषके देण्यात येतील.**

९. स्पर्धेची अंतिम फेरी दिनांक ऑक्टोबर २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री. शिवाजी मंदिर नाट्यगृह, दादर (प.), मुंबई-४०००२८ येथे घेण्यात येईल. अंतिम फेरीचा निर्णय स्पर्धा संपल्यावर परीक्षक जाहीर करतील. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ अंतिम फेरीचा निर्णय लागल्यानंतर तिथेच होईल. संस्थाना, कलाकार तंत्रज्ञाना देण्यात येणारी पारितोषिके धनादेशाद्वारे देणार असल्यामुळे संबधीत सर्वनावे सुवाच्य अक्षरात योग्य लिहिले असल्याची स्पर्धक संस्थांनी दक्षता घ्यावी.

१०. अपवादात्मक परिस्थिती वगळता कोणत्याही स्पर्धक संस्थेला प्राथमिक फेरीत सहभागी झालेले कलावंत तंत्रज्ञ अंतिम फेरीसाठी बदलता येणार नाहीत. अपवादात्मक परिस्थितीतही सदरहू बदलास संमती देणे न देणे आयोजकांवर अवलंबून राहील.

११. अंतिम फेरीतील सादरीकरणासाठी प्रत्येक संस्थेने कलावंत, तंत्रज्ञ सह सादरीकरणवेळेपूर्वी दोन तास स्पर्धा सादरीकरण ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१२. अंतिम फेरीतील संस्थांना, एकांकिकेच्या प्रयोगा साठी, १ तासाचा कालावधी देण्यात येईल. दिलेल्या कालावधीत आणि पुरविलेल्या सामुग्रीतच नेपथ्य, प्रकाश योजने सह प्रयोग करणे प्रत्येक स्पर्धक संस्थेला बंधनकारक राहील.

१३. अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धक संस्थांनी प्रकाशयोजना व नेपथ्याचा आराखडा सोमवार दिनांक २३ ऑक्टोबर २०१८रोजी संध्या. ६ ते ८ या वेळेत मंडळाच्या कार्यालयात आणून देणे बंधनकारक आहे.

१४. एकांकिका स्पर्धेचे नियम व अटी यांचे पालन न करणाऱ्या संस्थेला प्रवेश अर्ज / सादरीकरण नाकारण्याचा अधिकार मंडळाकडे राहील.

१५. स्पर्धेची प्रवेश फी रु. ५००/- (रुपये पाचशे फक्त). राहील.

१६. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धक संस्थांना अंतिम फेरीच्या प्रत्येकी पाच प्रवेशिका तसेच स्पर्धक संस्थांना सवलत दरात तिकीटे २० ऑक्टोबर २०१८ पर्यंत सायं. ७ ते ८ या वेळेत मंडळाच्या कार्यालयात देण्यात येतील. या वेळी स्पर्धक संस्थेने प्रवेश फी भरल्याची पावती दाखविणे बंधनकारक राहील. विना तिकीट प्रेक्षागृहात आढळणाऱ्यावर कारवाई केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

१७. पूर्णपणे भरलेल प्रवेश अर्ज दि. २२ सप्टेंबर ते २८सप्टेंबर २०१८ पर्यंत सायंकाळी ७.०० ते ८.०० या वेळेत मंडळाच्या कार्यालयात स्विकारले जातील. प्रवेश अर्जासोबत प्रवेश फी भरणे प्रत्येक स्पर्धक संस्थेस बंधनकारक राहील. भरलेली प्रवेश फी कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

१८. अंतिम फेरीत निवड झालेल्या स्पर्धक संस्थांना मंडळातर्फे खालील साहित्य शुल्क आकारुन पुरविले जाईल. या साहित्याव्यतिरिक्त कोणतेही साहित्या वापरता येणार नाही.

**नेपथ्य**

| लेव्हल्स साईझ | नग |
|---|---|
| ६फूट x ४ फूट x ९ इंच ........................ | २ |
| ८फूट x ४ फूट x ९ इंच ........................ | २ |
| ८फूट x ४ फूट x१८ इंच ........................ | २ |
| ६फूट x ४ फूट x १८इंच एकूण ............... | २ |
| २फूट x २ फूट x ६ इंच ठोकळे ............... | २ |
| दरवाजा चौकटी ........................................ | २ |
| खिडकी चौकट ........................................ | २ |
| टेबल ........................................ | २ |
| टिपॉय........................................ | १ |

**प्रकाश योजना**

१५ स्पॉट्स १०ड़िमर्स

**रंगभूषा**

विशेष रंगभूषेसाठी स्पर्धक संस्थांना आयोजकांनी नियुक्त केलेल्या रंगभूषाकारांशी सादरीकरणापूर्वी चार दिवस आधी संपर्क साधावा लागेल व त्यासाठी येणारा सर्व खर्च परस्पर संस्थेला करावा लागेल. त्या संदर्भातील माहिती प्राथमिक स्पर्धेच्या वेळी दिली जाईल.

**१९.अंतिम फेरीतील बक्षिसे**

सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम क्रमांक रु. १०,००० /- धनादेश, स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक
द्वितीय रु. ७००० /- धनादेश, स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक
तृतीय रु. ५००० /- धनादेश, स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्रक

अंतिम फेरी सादर केलेल्या परंतु प्रथम तीन क्रमांकात न आलेल्या सादरकर्त्या संस्थेला प्रत्येकी रु. २००० चा धनादेश.

| | |
|---|---|
| सर्वोत्कृष्ट अभिनय (स्त्री / पुरूष ) प्रत्येकी | रु. ५००/- फक्त सहा प्रशस्ती पत्र. |
| सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक | |
| प्रथम | रु. १००० /- |
| द्वितीय | रु. ५०० /- |
| सर्वोत्कृष्ट लेखक | रु. ५०० /- |
| सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना | रु. ५०० /- |
| सर्वोत्कृष्ट नेपथ्य | रु. ५०० /- |
| सर्वोत्कृष्ट संगीत | रु. ५०० /- |

आवश्यकते नुसार कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार स्पर्धा आयोजन समिती स राहतील.

**स्पर्धा आयोजन समिती**

रविंद्र वि. ढवळे
कला विभाग प्रमुख
९९२०५७२९७४

श्रीकृष्ण राणे
कार्यवाह
९८२०५९९८७०

**स्पर्धा आयोजन समिती**

समिर चव्हाण
९८२१८१२३३८

प्रिती शिंदे
९७६९०७२६१४

# अमर हिंद मंडळ, दादर

**आयोजित**

**राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा - २०१८**

**वर्ष २१ वे**

**संस्थेचे प्रवेश अर्ज**

दि. ____________

**अनु. क्र.**

संस्थेचे नाव ____________________________________________

संस्थेचा पूर्ण पत्ता ____________________________________________

____________________________________________

____________________________________________

दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक ____________________

संस्थेचा / प्रतिनिधीचा

संस्थेच्या प्रतिनिधीचे नाव पूर्ण पत्ता दूरध्वनी क्रमांक

____________________________________________

____________________________________________

ई मेल ॲड्रेस

स्पर्धेचे नियम, अटी आणि आयोजकातर्फे आवश्यक भासल्यास करण्यात येणारे बदल मला मान्य असून ते माझ्यावर बंधनकारकर राहतील.

संस्थेचा शिक्का व संस्था प्रतिनिधीची स्वाक्षरी